


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ | Mob- 9822720784 | Email- jansanchlan@gmail.com | RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३५३ वा | सोमवार दि २७ एप्रिल २०२६ | पृष्ठ ८ | किमंत ३ रुपये

# शिवछत्रपतींचा अवमान करणाऱ्या भोंदू बागेश्वरवर महाराष्ट्रात बंदी घाला, अन्यथा - आमदार रोहित पवारांची मागणी

**वृत्तसंस्था/ नागपूर**

आपल्या वेगवेगळ्या दाव्यांमुळे नेहमीच चर्चेत राहणारे बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा पुन्हा एकदा मोठ्या वादात सापडले आहेत. नागपूर येथील भारदुर्गा शक्तिस्थळ शिलान्यास कार्यक्रमात बोलताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अत्यंत वादग्रस्त विधान केले. युद्ध करताना महाराज थकले होते, त्यांनी आपला मुकूट समर्थ रामदास स्वामींच्या चरणी अर्पण करून विश्रांतीची इच्छा व्यक्त केली होती, असा दावा धीरेंद्र शास्त्री यांनी केला. विशेष म्हणजे, ज्या व्यासपीठावर सरसंघचालक मोहन भागवत, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते, त्याच ठिकाणी हे वक्तव्य केल्याने आता संतापाची लाट उसळली आहे. धीरेंद्र शास्त्री यांनी शिवराय आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या भेटीचा एक प्रसंग सांगताना दावा केला की, शिवरायांनी थकल्यामुळे राजपाट सोडण्याची तयारी दर्शवली होती. त्यावर रामदास स्वामींनी तो मुकूट पुन्हा महाराजांच्या डोक्यावर ठेवून, हे राज्य माझे आहे आणि तुला फक्त त्याचे संचालन करायचे आहे, असे सांगितले. इतिहासाचा कोणताही आधार नसलेले हे विधान समोर आल्यानंतर शिवप्रेमींमधून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. यापूर्वीही तुकोबाराय आणि ज्ञानेश्वर माऊलींबद्दल वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्या बागेश्वर बाबांनी आता थेट शिवछत्रपतींचा अवमान केल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणावर आता राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आक्रमक पवित्रा घेत सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. शिवराय थकले होते, असे म्हणणारा हा भोंदू महाराष्ट्रात पुन्हा दिसता कामा नये, अशा शब्दांत त्यांनी त्यांचा संताप व्यक्त केला. छत्रपतींचा अवमान होत असताना राज्यातील बडे नेते त्याच व्यासपीठावर असतानाही शांत कसे बसले? असा सवाल करत, बागेश्वर बाबावर महाराष्ट्रात तातडीने बंदी घालण्याची मागणी पवार यांनी केली आहे.



शिवराय थकले आणि राजपाट समर्थांकडं दिला, हे तथाकथित बागेश्वर नामक भोंदूचं वक्तव्य अत्यंत संतापजनक आहे. यापूर्वीही या भोंदूसह त्याच्या काही सहकाऱ्यांनी जगद्गुरु संत तुकोबाराय, संत ज्ञानेश्वर माऊली आणि एकूणच संत परंपरेसंदर्भात गरळ ओकली होती. वारंवार अशाप्रकारची वक्तव्ये करून महाराष्ट्राच्या संत परंपरेला, छत्रपतींच्या इतिहासाला, फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांना गालबोट लावून महापुरुषांचं महत्व कमी करण्याचा एककलमी कार्यक्रम तर राबवला जात नाही ना? अशी शंका येते. भोंदू बागेश्वरकडून शिवछत्रपतींचा अवमान होत असताना राज्यकर्तेही त्या स्टेजवर होते याचं जास्त दुःख वाटतं. शिवछत्रपतींचा अवमान करणाऱ्या भोंदू बागेश्वरवर महाराष्ट्रात बंदी घालावी. हा भोंदू यापुढं महाराष्ट्रात दिसता कामा नये, अन्यथा भोंदू बागेश्वरसह सरकारलाही महागात पडेल. सरकार या भोंदूवर कारवाई करेल असं वाटत नाही. त्यामुळं सहन करत दुर्लक्ष करायचं की धडा शिकवायचाफ, हे आता शिवप्रेमी जनता आणि या सर्व महामानवांच्या विचारावर प्रेम करणाऱ्या सर्वसामान्यांनीच ठरवायला हवं.

# राघव चड्ढांची मध्यस्थी, महाराष्ट्र सदनात अमित शाहांची आप खासदारांशी भेट, भाजप प्रवेशाची राजकीय पटकथा

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

ये तो होना ही था... या एका वाक्यात आम आदमी पक्षात राघव चड्ढा यांनी घडवलेल्या भूकंपाचे सार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. एका क्षुल्लक घटनेचे निमित्त होऊन आपचे सर्वसर्वा अरविंद केजरीवाल आणि राघव चड्ढा यांच्यात दुरावा निर्माण होणे आणि चड्ढा यांच्या राज्यसभेतील उपनेतेपदावर संक्रांत येणे हा घटनाक्रम पाहिला, तर राज्यसभेतील १० पैकी सात खासदारांनी आपला रामराम करण्याची घटना मागील महिनाभरापासून पडद्यामागे सुरू असलेल्या हालचाली आणि वाढत्या असंतोषाचा परिपाक असल्याचे दिसते चड्ढा यांच्यासह सात आप खासदारांच्या भाजपमधील विलीनीकरणाचे दस्तऐवज राज्यसभा अध्यक्षांकडे सादर केले गेले. चड्ढा यांनी केजरीवालांचे एकेकाळचे अत्यंत विश्वासू संदीप पाठक आणि केजरीवालांनीच नेमलेले अशोक मित्तल यांच्यासह राज्यसभा सभापतींना याबाबतचे पत्र दिले. हे केवळ एक पक्षांतर नाही, तर सलग १२ वर्षे सत्ता न गमावलेल्या आणि केजरीवाल यांच्या पोलादी पकडीत असलेल्या आपच्या संसदीय अस्तित्वालाच हादरा मानला जात आहे. या घडामोडीच्या केंद्रस्थानी असलेले चड्ढा यांनी मागील महिनाभरात वेगवेगळ्या टप्प्यांवर खासदारांना एकत्र ठेवत रणनीती आखली. त्यांच्याच मध्यस्थीने खासदारांची गृहमंत्री अमित शहा यांच्याशी भेट घडवून आणली. भेटीगाठींचे एक ठिकाण खुद्द महाराष्ट्र सदन असल्याचे समजते! कायद्यानुसार सदस्यत्व टिकवण्यासाठी दोन-तृतीयांश बहुमत



आवश्यक असल्याने १० पैकी किमान सात खासदारांची साथ अनिवार्य होती. अधिक खासदारांना सोबत आणण्याचाही प्रयत्न झाला. पंजाबातील पर्यावरणतज्ज्ञ बाबा बलवीरसिंग सीचेवाल यांना पटवण्याचे प्रयत्न झाले. मात्र त्यांनी नकार दिला. खासदारांच्या निर्णयामागे वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, राजकीय भविष्य आणि तपास यंत्रणांचा दबाव हे तीन मोठे घटक आहेत. यातील काही खासदार उद्योगपती असल्याने केंद्रीय तपास संस्थांनी नजर वळवली आणि तिथेच चलबिचल सुरू झाली. बंडखोरीत संदीप पाठक यांचा सहभाग मोठा धक्का मानला जातो. पंजाब, दिल्ली निवडणुकीनंतर अपेक्षित स्थान न मिळाल्याने ते नाराज होते. अशोक मित्तल यांच्यावर ईडी कारवाईनंतर त्यांची भूमिका बदलली. राघव चड्ढा आणि केजरीवाल यांच्यातील दरी २०२४ पासून वाढू लागली. केजरीवाल यांच्या अटकेनंतर चड्ढा यांची गूढ शांतता, डोळ्यांच्या विकाराचे निमित्त साधून लंडनमध्ये ठोकलेला मुक्काम, पक्षाच्या आंदोलनांपासून दूर राहणे आणि २०२५च्या निवडणुकीत कमी सक्रियता यामुळे प्रश्न उपस्थित झाले. त्यानंतर त्यांना राज्यसभेतील उपनेतेपदावरून हटवण्यात आले. ही घटना केवळ सात खासदारांचे पक्षांतर नाही, तर एक व्यवस्थित आखलेली राजकीय पटकथा आहे. भाजपसाठी ही प्रतिस्पर्ध्याला कमकुवत करण्याची मोठी चाल मानली जाते

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मोसमी वाऱ्यांवर शेतीचे हेलकावे



सन २०२६मध्ये सरासरीच्या सुमारे ९२ टक्के पाऊस पडेल, अशी शक्यता भारतीय हवामान विभागाने नुकतीच वर्तवली. ङ्गएल निनोफ्मुळे जागतिक तापमान वाढून भारतातील मान्सूनवर विपरीत परिणाम होण्याचे संकेत असून यंदा पाणीटंचाईचाही इशारा देण्यात आला आहे. जगभरातील युद्धाच्या सावटाबरोबरच आता दुष्काळाचे भयही अर्थव्यवस्थेला भेडसावत आहे. मात्र, सामान्यांच्या मनात प्रश्न असा आहे, की आजच्या एआय युगात, भारतीय अर्थव्यवस्था जगातील पहिल्या पाच-सहा राष्ट्रांत गणली जात असतानाही, संपूर्ण अर्थव्यवस्था मोसमी वाऱ्यांवर, म्हणजे मान्सूनवर अवलंबून का? एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीक्षेत्राचा वाटा इतर क्षेत्रांच्या तुलनेत कमी असणे, हे प्रगत अर्थव्यवस्थेचे एक लक्षण मानले जाते. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये शेतीक्षेत्राचा वाटा १९८०पर्यंत सरासरी ४० टक्क्यांहून अधिक होता; तो कमी होऊन २०२६ मध्ये फक्त १८ टक्क्यांवर आला आहे, कारण तुलनेने इतर क्षेत्रांतील उत्पन्न वाढले आहे. मग भारत आजही शेतीप्रधान देश आहे का? टक्केवारीच्या स्वरूपात शेतीक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील सहभाग कमी असला तरी शेती हाच भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालानुसार आजही शेतीक्षेत्र ४६.१ टक्के लोकांना रोजगार पुरवत आहे. म्हणजेच जवळपास निम्मी लोकसंख्या आजही पोटापाण्यासाठी शेतीवरच अवलंबून आहे! त्यामुळेच दुष्काळासारख्या अस्मानी संकटामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबांना हाताला काम आणि पोटाला भाकरी मिळणे बंद झाले की, त्याचे पडसाद संपूर्ण अर्थव्यवस्थेवर उमटतात ही वस्तुस्थिती आजही कायम आहे. शेतीक्षेत्राचे इतर क्षेत्रांशी असलेले दुवे इतके घट्ट आहेत, की उर्वरित क्षेत्रांना शेतीपासून तोडता येत नाही. खते, बियाणे, ट्रॅक्टर, वीज, गोदामे यांसाठी शेतकरी पुरवठादारांशी जोडलेले असतात; तर शेतीमालाच्या विक्रीसाठी त्यांना बाजारपेठांच्या पुरवठा-साखळीत सहभागी व्हावे लागते. या दोन्ही साखळ्या सुरळीत असतील, तरच शेतमालाची मूल्यवृद्धी होते, योग्य भाव मिळतो आणि अपव्यय कमी होतो. म्हणूनच शेतापासून किरकोळ विक्रीपर्यंतच्या पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करणे, शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीसी) आणि डिजिटल बाजारपेठांना प्रोत्साहन देणे या गोष्टी महत्त्वाच्या ठरत आहेत. फेब्रुवारी २०२५ पर्यंत ङ्गप्रधानमंत्री किसान संपदाफ या योजनेअंतर्गत ४१ मेगा फूड पार्क, ३९४ कोल्ड चेन प्रकल्प आणि ६१ पुरवठा-साखळी प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे आणि त्यामुळे शेतीव्यवसायाला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. म्हणजेच शेतीतील प्रत्यक्ष ४६ टक्के रोजगाराबरोबरच पुरवठा साखळीतील प्रक्रिया उद्योग, वितरण, कमिशन एजंट, किरकोळ विक्रेते आणि असंख्य लघू-मध्यम-सूक्ष्म उद्योगही शेतीवरच अवलंबून आहेत. भाजीपाला, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, कापड, साखर अशा हजारो शेतीनिगडित उद्योगांमुळे औद्योगिक क्षेत्रही शेतीशी जोडले गेले आहे. प्रक्रिया केलेले अन्न, डबाबंद फळांचे रस, फळे आणि फ ुलशेती हे परंपरागत व आधुनिक व्यवसाय शेतीक्षेत्रातून निर्यातीला चालना देतात. त्यामुळे शेतीक्षेत्राचा देशाच्या उत्पन्नामधील प्रत्यक्ष वाटा १८ टक्के असला, तरी अर्थव्यवस्थेशी असलेल्या सर्वदूर दुव्यांमुळे शेतीवरील संकट हे अन्नधान्य पुरवठा, रोजगारनिर्मिती, उद्योग-सेवा क्षेत्र आणि निर्यात या सगळ्यांवर परिणाम करते. वर उल्लेख केल्याप्रमाणे भारतीय शेतीक्षेत्राच्या अर्थव्यवस्थेशी असलेल्या सर्वदूर दुव्यांमुळे महागाई दर, व्याजदर एवढेच नव्हे, तर शेअर बाजार निर्देशांकदेखील मान्सून अंदाजानुसार कमी-जास्त होत असतो. महागाईचा दर मोजताना अन्नधान्य हा ग्राहकाच्या दैनंदिन खर्चातील सर्वांत मोठा असा तब्बल ३६ टक्के घटक मानला जातो. त्यामुळेच कमी मान्सूनच्या अंदाजानुसार महागाई दर वाढू शकतो. नुकत्याच जाहीर झालेल्या रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक धोरणात व्याजदरात बदल करण्यात आलेला नाही; कारण रिझर्व्ह बँकेच्या अहवालाप्रमाणे यंदा ङ्गएल निनोफ्मुळे अन्नधान्याच्या किमतींमध्ये अनिश्चितता निर्माण होईल आणि पुरवठा कमी असल्यामुळे आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी महागाईचा दर अंदाजे ४.६ टक्के राहील. युद्धजन्य आणि दुष्काळजन्य अनिश्चिततेत भर पडू नये म्हणून व्याजदराचे धोरण जैसे थेफ ठेवण्यात आले आहे. पाण्याची उपलब्धता हा पीकवाढीचा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. पावसाच्या कमतरतेमुळे केवळ खरीप हंगामावरच नव्हे, तर सिंचन व्यवस्थेतील पाणीसाठ्यावर आणि त्यायोगे रबी हंगामातील पिकांच्या वाढीलाही फटका बसतो. परिणामी अन्नसुरक्षेचा आणि भाववाढीचा धोका निर्माण होतो. हंगामात उशिरा दाखल होणारा पाऊस आणि महिन्यागणिक बदलणारे पावसाचे प्रमाण हेदेखील शेतकऱ्यांसमोरील सततचे आव्हान आहे. बी-बियाणे, मजुरी, कीटकनाशके, खते यांवरील खर्च भरून काढून आर्थिक गणित कसे जुळवायचे ही विवंचना शेतकरी कुटुंबाला सतावत असते; आणि या कोंडीतून सुटण्यासाठी कर्जबाजारीपणाचे ओझे उचलणे क्रमप्राप्त ठरते. दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या पाण्याचा आणि चाऱ्याचाही गंभीर प्रश्न निर्माण होतो. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्याला व शेतमजुराला काम मिळेनासे होते आणि पुरेसे उत्पन्न मिळवण्यासाठी अनेक कुटुंबांना स्थलांतर करण्याशिवाय पर्याय उरत नाही. थोडक्यात, ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णतः विस्कळीत होऊन जाते. त्यामुळे वारंवार येणाऱ्या दुष्काळी परिस्थितीचे आपत्ती नियोजन आणि त्यासाठीची आर्थिक तरतूद हा विकास धोरणाचा मोठा भागच बनून राहतो.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## पश्चिम बंगाल–तमिळनाडू निवडणुकांत विक्रमी मतदान

# बंगालमध्ये 91.78% तर तमिळनाडूत 84% पेक्षा अधिक मतदान

**दिल्ली/वृत्तसंस्था**

मतदारयाद्यांच्या 'विशेष सखोल फेरतपासणी' (एसआयआर) मोहिमेंतर्गत मोठ्या संख्येने नावे वगळल्याच्या तक्रारींनंतर घेण्यात आलेल्या पश्चिम बंगाल आणि तमिळनाडू विधानसभेच्या निवडणुकीत गुरुवारी विक्रमी मतदानाची नोंद झाली. पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात ९१.७८ टक्के मतदान झाले, तर तमिळनाडूमध्ये ८४.६९ टक्के मतदान झाले. दोन्ही राज्यांमध्ये मतदान केंद्रांसमोर दिवसभर रांगा लागल्या होत्या. पश्चिम बंगालमध्ये अनेक ठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडल्या, तर तीन उमेदवारांवरही हल्ला करण्यात आला.



२९४ सदस्य संख्या असलेल्या पश्चिम बंगाल विधानसभेतील १५२ मतदारसंघांमध्ये गुरुवारी सकाळी ७ वाजता कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत मतदानाला सुरुवात झाली. या निवडणुकीत १६७ महिलांसह १,४७८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. सत्ताधारी तृणमूल काँग्रेस (टीएमसी) आणि भाजप यांच्यातील अत्यंत चुरशीच्या लढतीतील निर्णायक फेरी मानल्या जाणाऱ्या या मतदानात, मतदान केंद्रांबाहेर लागलेल्या लांबच लांब रांगांमधून मतदारांचा जोरदार सहभाग दिसून आला.

पश्चिम बंगालमध्ये २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत ८२.३० टक्के मतदान झाले होते. यंदा त्यात भरघोस वाढ झाली असून हे आतापर्यंतचे सर्वाधिक मतदान मानले जात आहे. सर्वाधिक मतदान दक्षिण दिनाजपूर जिल्ह्यात ९३.१२ टक्के झाले. कूचबिहार (९२.०७ टक्के), बिरभूम (९१.५५ टक्के) आणि मुर्शिदाबाद (९१.३६ टक्के) या जिल्ह्यांतही मतदानाच्या टक्केवारीने नव्वदी ओलांडली.

विश्लेषकांच्या मते, मतदानाचा हा टक्का वाढलेली राजकीय एकजूट आणि एसआयआर योजनेचा सांख्यिकीय परिणाम दर्शवतो. या योजनेअंतर्गत राज्यभरातील मतदारयादीतून ९१ लाखांहून अधिक नावे वगळण्यात आली होती.

तमिळनाडू राज्यातही मतदारांचा भरघोस प्रतिसाद दिसून आला. दक्षिण भारतातील या राज्यात ८४.४१ टक्के मतदानाची नोंद झाल्याचे निवडणूक आयोगाने सांगितले. या राज्यात २०११ च्या विधानसभा निवडणुकीत ७८.२१ टक्के मतदानाची नोंद झाली होती, ज्यामध्ये अण्णा द्रमुकने एकतर्फी विजय मिळवला होता. यंदाच्या निवडणुकीत मतदारांनी हा विक्रम मोडीत काढला. २३४ मतदारसंघ असलेल्या या राज्यात द्रमुक आणि अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखाली रालोआ यांच्यात लढत आहे.

तमिळनाडूमध्ये सर्वाधिक मतदान सेलम जिल्ह्यात ८८.०२ टक्के झाले. चेन्नईमध्ये ८१.३४ टक्के, मदुराईमध्ये ७७.८९ टक्के, कोईम्बतूरमध्ये ८२.३३ टक्के मतदान झाले.

या राज्यात ऑक्टोबर २०२५ मध्ये ६.४१ कोटी मतदारसंख्या होती. मात्र 'एसआयआर' योजनेमुळे अनेक मतदारांची नावे वगळण्यात आल्याने मतदारसंख्या ५.७३ कोटी झाली. २०२१ च्या निवडणुकीत सुमारे ६.२९ कोटी मतदारांची नोंदणी होती. मात्र यंदा ही संख्या ५६ लाखांनी कमी झाली.

## वीज निर्मिती क्षेत्रात पहिले पाऊल; तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्थेबरोबर करार

**मुंबई/वृत्तसंस्था**

जलसंपदा विभाग आणि तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्था मर्यादित यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तीन उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी सुमारे ५,२०० कोटी रुपयांचा सामंजस्य करार गुरुवारी करण्यात आला. आजपर्यंत एकूण ५९ करार करण्यात आले असून, ८०,५१५ मेगावॅटवर गेली आहे. या करारांमुळे कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर ऊर्जा साठवणूक करून राष्ट्रीय ग्रीड स्थिर ठेवण्याची क्षमता राज्यात निर्माण होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हटले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात हा करार करण्यात आला. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, आमदार डॉ. विनय कोरे, नवशक्ती निर्माण संस्थेचे अध्यक्ष नामदेव एच. पाटील आदी उपस्थित होते. तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्थेच्या वतीने कुंभी ऑफ स्ट्रीम क्लोज्ड लूप उदंचन प्रकल्पाच्या वतीने सिंधुदुर्ग येथे दोन व शाहूवाडी येथे कडवी ऑफ स्ट्रीम क्लोज्ड लूप उदंचन प्रकल्प, असे तीन प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या माध्यमातून सुमारे ५,१९९ कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन, ११०० मेगावॅट वीज निर्मिती क्षमता स्थापित होणार आहे. या तीनही प्रकल्पांतून १,१०० जणांना रोजगार मिळणार आहे. राज्याने उदंचन जलविद्युत प्रकल्पांमध्ये आतापर्यंत ८०,००० मेगावॅट क्षमतेचा टप्पा ओलांडला आहे. अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातही मोठी झेप घेतली आहे. अशा परिस्थितीत उदंचन जलविद्युत प्रकल्प (पीएसपी) हे भविष्यातील ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. देशातील अनेक राज्ये सौरऊर्जेमध्ये आघाडीवर आहेत. राजस्थान आणि गुजरातसारख्या राज्यांकडे विस्तीर्ण वाळवंट क्षेत्र असल्याने तेथे मोठ्या प्रमाणावर सौर प्रकल्प उभे राहत आहेत.

## सरकारी कर्मचाऱ्यांचा संप चौथ्या दिवशीही सुरूच राहणार; मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीची प्रतीक्षा..

**मुंबई/वृत्तसंस्था**

सरकारी कर्मचाऱ्यांच्या सुधारित निवृत्ती वेतन योजनेसह १८ मागण्यांवर कोणताही तोडगा न निघाल्याने उद्या सलग चौथ्या दिवशी हा संप कायम राहणार आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला मात्र बैठकीचे इतिवृत्त अद्यापपर्यंत कर्मचारी संघटनांना देण्यात आलेले नाही. सुधारित पेन्शन योजनेबाबतही कोणताच ठोस निर्णय झालेला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडूनच मागण्यांबाबत योग्य भूमिका जाहीर करण्यात यावी, अशी भूमिका कर्मचारी संघटनेकडून घेण्यात आली आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांचा संप २१ एप्रिलपासून सुरू झाला असून २२ एप्रिल रोजी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीला मुख्य सचिवांकडून चर्चेसाठी निमंत्रित करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांच्या १८ प्रलंबित मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी सकारात्मक प्रतिसाद दर्शविल्यानंतरही कोणताही ठोस निर्णय सरकारकडून जाहीर करण्यात आला नाही.

त्याचप्रमाणे या बैठकीचे इतिवृत्तही संघटनांना देण्यात आले नाही. सुधारित निवृत्ती वेतन योजनेबाबतही कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांच्यास्तरावर अधिकृत बैठक झाल्याशिवाय ठोस निर्णय होऊ शकणार नाही का, असा सवाल कर्मचारी समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी केला. मागील १५ महिने लक्षवेधी आंदोलन करून शासनाकडून विनम्रपणे योग्य निर्णयाची अपेक्षा केली; परंतु सरकारने आजपर्यंत दुजाभाव दाखवला आहे. कर्मचाऱ्यांचा संप आंदोलनाला पूर्ण पाठिंबा असून शिक्षकही मोठ्या प्रमाणात संपात उतरले असल्याचा दावा कमचारी संघटनेकडून करण्यात आला आहे.

### महसुलावर होणार परिणाम..

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे राज्याच्या महसुलावर परिणाम होत आहे. विवाह नोंदणी कार्यालयापासून मुद्रांक शुल्क विभागाचे कामकाज ठप्प होण्याची वेळ आली आहे. संपावर कोणताही तोडगा काढण्याच्या संदर्भात शासकीय पातळीवर आज कोणतीही बैठक झाली नाही. जिल्हाधिकारी कार्यालये, कोषागार (ट्रेझरी), कार्यालये, वस्तू व सेवा कर, आरटीओ, पाटबंधारे, कृषी विभाग कार्यालये, अनुदानित महाविद्यालये व शाळांवर संपाचा थेट परिणाम जाणवू लागला आहे.

## पश्चिम बंगाल मतदानादरम्यान भाजप उमेदवार सुवेंदू सरकार यांच्यावर हल्ला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमध्ये मतदानाच्या दिवशीच एक घटना घडली आहे ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यासाठी मतदान करण्यात आलं. दरम्यान भाजपा उमेदवार सुवेंदू सरकार यांना टीएमसीच्या कार्यकर्त्यांनी पळवून पळवून मारलं आहे. नेमकं हे प्रकरण काय आपण जाणून घेऊ.

भाजपाचे उमेदवार सुवेंदू सरकार यांना पळवून पळवून मारहाण करण्यात आली आहे. दक्षिण दिनाजपूर जिल्ह्यात कुमारग्राम विधानसभा क्षेत्रात कुमारगंज येथील उमेदवार सुवेंदू सरकार यांना पळवून मारहाण करण्यात आली. तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ही मारहाण केल्याचा आरोप होतो आहे. सुवेंदू सरकार आणि तृणमूलच्या समर्थकांमध्ये आधी बाचाबाची झाली. ज्यानंतर वाद इतका वाढला की हे कार्यकर्ते सरकार यांच्या मागे लागले आणि त्यांना मारहाण केली. सरकार यांचे अंगरक्षक त्यांच्यासह उपस्थित होते. त्यांनी सरकार यांना वाचवण्याचा प्रयत्न केला, पण तृणमूलचे कार्यकर्ते इतके आक्रमक झाले होते की अंगरक्षकांनाही काही करता आलं नाही.

सुवेंदू सरकार यांना मारहाण करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. जेव्हा त्यांना पळवून पळवून मारण्यात आलं. तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते आणि समर्थक यांचा जमाव वाढला आणि ही घटना घडली. सुवेंदू सरकार हे भाजपाचे उमेदवार आहेत. पण जेव्हा ही घटना घडली तेव्हा त्यांच्यासह त्यांचे अंगरक्षक वगळता दुसरी सुरक्षा व्यवस्था नव्हती. तसंच केंद्रीय सुरक्षा दलाचे जवान किंवा पोलीस किंवा कुठलीही विशेष व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. त्यांना मारहाण होत असतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.



दक्षिण दिनाजपूर भागातील कुमारगंज विधानसभा क्षेत्रामधील एका ठिकाणी मतदान केंद्र हायजॅक करण्यात येत असल्याची माहिती भाजपचे उमेदवार सुवेंदू सरकार यांना मिळाली होती. ही माहिती मिळताच सुवेंदू सरकार हे काही लोकांसह तिथे पोहोचले होते. पण, तिथे जाताच तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून सुवेंदू सरकार यांना पळवून-पळवून लाथा बुक्क्या आणि काठीने मारहाण करण्यात आली. तिथे पोलीसही उपस्थित होते, परंतु तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते त्यांना मारतच राहिले. सगळी घटना घडताना पोलीस बघ्याच्या भूमिकेत होते असाही आरोप होतो आहे.

सुवेंदू सरकार यांची या घटनेनंतरची प्रतिक्रिया समोर आली आहे, ते म्हणाले कुमारगंज विधानसभा क्षेत्रात आम्ही पोलिंग एजंट्सना ८ ते १० ठिकाणांहून बाहेर काढलं. मी तिथे स्वतः गेलो होतो. मी जेव्हा २४ क्रमांकाच्या बूथवर गेलो होतो तिथे माझ्यावर हल्ला करण्यात आला होता. तृणमूलच्या कार्यकर्त्यांनी दहशतीचं वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मी तिथे पोहचलो तेव्हा माझ्याबरोबर एकच अंगरक्षक होता. याच परिस्थितीचा फायदा घेऊन माझ्यावर तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला असा आरोप सुवेंदू सरकार यांनी केला आहे. टीएमसीच्या लोकांना त्यांचा पराभव स्पष्ट दिसतो आहे, त्यामुळे माझ्यावर हा भ्याड हल्ला करण्यात आला असंही सुवेंदू सरकार म्हणाले.

## रणथंबोरमध्ये पर्यटकांच्या बेशिस्तीचा व्हिडिओ व्हायरल


# पैसे मोजले म्हणजे वाघ आपली 'प्रॉपर्टी'?


■ नागपूर, वृत्तसंस्था :

व्याघ्रदर्शनासाठी पैसे दिले म्हणजे त्याचे मालकी हक्क आपल्याला मिळाले, अशाच अर्थाने पर्यटक वावरतात. मग त्याला बघण्यासाठी सफारी वाहनांनी त्याची कोंडी करून असुरी आनंद पर्यटक उपभोगतात. रणथंबोर व्याघ्रप्रकल्पाचा असाच एक व्हिडिओ समोर आला आहे.

काही दिवसांपूर्वी रणथंबोर व्याघ्रप्रकल्पात पर्यटकांच्या वाहनांनी वाघाची कोंडी केल्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. अनेक वाहनांनी वाघाचा मार्ग अडवला. ज्यामुळे तो वाघ प्रचंड तणावग्रस्त दिसून येत होता. व्हिडिओमध्ये वाघाभोवती पार्क केलेली अनेक सफारी वाहने दिसत आहेत. पर्यटक वाघाचा मार्ग अडवत वाघाला जवळून पाहण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे वाघ सावध आणि अस्वस्थ दिसत आहे. तो आवाज देखील करत आहे, जो तणावाचे लक्षण मानला जातो.

रणथंबोरच्या अलीकडे व्हायरल झालेल्या व्हिडिओत दिसून येत आहे की वाघाच्या सभोवताली पर्यटक वाहनांनी गराडा घातलाय. तो शांतपणे उभा राहून त्याच्या सुटकेचा मार्ग शोधत आहे. पण पर्यटक त्याचे छायाचित्रण करत आहेत. वाघाची अस्वस्थता त्यांना दिसत नाही की दिसूनही ते दुर्लक्ष करत आहेत, असा प्रश्न यावेळी उपस्थित होत आहे. थोडी वाट मोकळी दिसताच वाघ त्यातून मार्ग काढतो आणि





रस्त्यावर येतो, पण येथेही त्याचे दुर्दैव आड येते. या मार्गावर देखील पर्यटक वाहने उभीच असतात. चिडलेला वाघ मात्र एका वाहनावर धावून जाण्याचा प्रयत्न करतो आणि तेव्हा कुठे ती वाहने माघारी फिरतात.

लोक या परिस्थितीला "सफारी जाम" म्हणत आहेत, जो अनेकदा राष्ट्रीय उद्यानांमध्ये दिसतो. जेव्हा वाहने वाघाचा मार्ग अडवतात तेव्हा त्याच्या सामान्य हालचाली विस्कळीत होतात. यामुळे प्राणी "लढायचे की पळून जायचे" अशा तणावाच्या स्थितीत येऊ शकतात. जास्त गर्दीमुळे वाघाच्या शरीरात ताण वाढू शकतो, ज्यामुळे तो आक्रमक बनतो. दरम्यान, या व्हिडिओवरून सोशल मीडियावर वादविवाद सुरू झाले आहेत.

### नेमके काय वाद सुरू आहेत?

वन्यजीव तज्ज्ञ म्हणतात की राष्ट्रीय उद्याने ही भेट देण्याची ठिकाणे नाहीत तर प्राण्यांसाठी सुरक्षित घरे आहेत. म्हणून, सफारी दरम्यान अंतर आणि शांतता राखणे अत्यंत महत्वाचे आहे. यामुळे पर्यटकांची सुरक्षितता आणि प्राण्यांचे कल्याण दोन्ही सुनिश्चित होते. लोक विचारत आहेत की सफारी नियमांचे योग्यरित्या पालन केले जात आहे का? वाढत्या वाघांच्या संख्येचे रक्षण करण्यासाठी नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. वन्यजीवांवर प्रेम करणे चांगले आहे, परंतु त्यांची सुरक्षा आणि आदर प्रथम आला पाहिजे.

## आरोपीला चार दिवसांची पोलीस कोठडी; बलात्कार करून हत्या केल्याची कबुली





■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

महसूल सेवेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या २२ वर्षीय मुलीवर बलात्कार करून तिची हत्या केल्याची कबुली या प्रकरणातील आरोपीने गुरुवारी दिली. त्यानंतर न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. राहुल मीणा असे या १९ वर्षीय आरोपीचे नाव असून तो पूर्वी या अधिकाऱ्याच्या घरी गृहसेवक म्हणून काम करत होता. बुधवारी सकाळी घडलेल्या गुन्ह्याप्रकरणी त्याला बुधवारी उशिरा अटक करण्यात आल्यानंतर गुरुवारी न्यायदंडाधिकारी दीपिका ठाकरन यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले.

आरोपी राहुलची न्याय-वैद्यकीय तपासणीत त्याला जखमा झाल्याचे आढळले होते. त्याविषयी विचारले असता त्याने गच्चीतून खाली येत असताना जखमी झाल्याचा दावा केला. मात्र, अधिक चौकशी केल्यानंतर त्याने आपला गुन्हा कबूल केला. "माझ्याकडून गुन्हा झाला, चूक झाली," असे तो म्हणाला. हा गुन्हा करण्याचे कारण विचारले असता, "लॉकर उघडण्यासाठी मृताच्या बोटांचे ठसे हवे होते," असे आरोपीने सांगितले. या प्रकरणातील मृत मुलगी दिल्ली आयआयटीची पदवीधारक होती आणि ती यूपीएससीच्या परीक्षेची तयारी करत होती. . पीडित मुलगी बेशुद्ध पडल्यानंतर आरोपी राहुलने तिच्यावर बलात्कार केल्याचा पोलिसांचा संशय आहे. त्यानंतर त्याने तिला खालील मजल्यावर ओढत नेले आणि तिच्या बोटांच्या ठशांचा वापर करून लॉकर उघडण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याने स्क्रूड्रायव्हरचा वापर करून लॉकर उघडले आणि त्यातील पैसे आणि दागिने चोरले. राहुल मीणाने घृणास्पद गुन्हा केल्याचे नमूद करून दिल्ली पोलिसांनी त्याची चार दिवसांची कोठडी मिळावी यासाठी अर्ज केला होता. मृत मुलीचा मोबाइल फोन शोधणे, आरोपीचा घरामध्ये प्रवेश करण्याचा आणि बाहेर जाण्याचा मार्ग निश्चित करणे आणि या गुन्ह्यात आणखी कोणी सहभागी होते का याचा शोध घ्यायचा आहे, असे फिर्यादी पक्षाने न्यायालयाला सांगितले. राजस्थानच्या अलवारमध्येही आरोपी विरोधात अशाच प्रकारचा गुन्हा दाखल आहे. त्याचाही तपास केला जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर त्याने तिचा रक्ताळलेला देह ओढत खालील मजल्यावरील लॉकर असलेल्या खोलीत आणला. चोरी केल्यानंतर त्याने आपले रक्ताचे डाग असलेले कपडे आणि चपला बदलल्या आणि ७.२० वाजता पसार झाला.

## 'बॉम्बस्फोट कोणी घडवला नाही, मग माझ्या मुलाचा मृत्यू कसा झाला?' मुलगा गमावलेल्या वडिलांचा उद्विग्न सवाल

■ नाशिक/वृत्तसंस्था

नाशिक जिल्ह्यातील मालेगावमध्ये १९ वर्षांपूर्वी साखळी बॉम्बस्फोट झाल्याची घटना घडली होती. या घटनेत तब्बल ३१ जणांचा मृत्यू झाला होता आणि शेकडो जण गंभीर जखमी झाले होते. या घटनेमुळे संपूर्ण देशभरात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणात आता मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी (२३ एप्रिल) महत्वाचा निकाल दिला आहे. या प्रकरणातील चार आरोपींच्या विरोधातील आरोप निश्चित करण्याचा सत्र न्यायालयाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला आहे. त्यामुळे जवळपास दोन दशकांचा काळ आणि तीन वेगवेगळ्या तपास यंत्रणांनी चौकशी केल्यानंतरही २००६ च्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील पीडित १९ वर्षांनंतरही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

दरम्यान, २००६ च्या मालेगाव साखळी बॉम्बस्फोटातील ९ संशयितांची याआधी विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली होती. त्यानंतर आता या प्रकरणातील चार संशयितांवरील आरोपपत्र देखील मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी रद्दबातल ठरवलं आहे. त्यामुळे २००६ च्या मालेगाव साखळी बॉम्बस्फोटातील गुन्हेगार कोण? असा सवाल उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर या बॉम्बस्फोट प्रकरणातील पीडित वडिलांनी आपल्या मुलाच्या मृत्यूवरून उद्विग्न सवाल विचारला. 'जर बॉम्बस्फोट कोणी घडवला नाही, तर मग माझ्या मुलाचा मृत्यू कसा



झाला?', असं पीडित वडिलांनी म्हटलं आहे.

२००६ च्या मालेगाव साखळी बॉम्बस्फोटाची घटना घडली होती, त्या घटनेच्या ठिकाणापासून जवळच मेडिकल असलेले शफीक अहमद मोहम्मद सलीम (५९) यांनी 'द इंडियन एक्सप्रेस'शी बोलताना सांगितलं की, "हमारी उम्मीद खत्म हो गई (आता कोणतीही अपेक्षा उरली नाही). माझ्या मुलाच्या (साजिद) बॅगा भरल्या होत्या. सर्व तयारी झाली होती. तो १० दिवसांत चीनला वैद्यकीय शिक्षणासाठी जाणार होता. मात्र, ८ सप्टेंबर २००६ रोजी मालेगावमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात तो (साजिद)आणि त्याचा १७ वर्षांचा चुलत भाऊ शहबाज या दोघांचा मृत्यू झाला आणि त्या दोघांचीही स्वप्न अपूर्ण राहिली."

## "लग्न करू नकोस, माझा मठ चालव"; पुन्हा एक भोंदूबाबा उजेडात

■ नाशिक/वृत्तसंस्था

भोंदू अशोक खरातचे प्रकरण गाजत असतानाच नाशिक जिल्ह्यात पुन्हा एका बाबाचे प्रताप समोर आले आहेत. महिलांच्या वैयक्तिक अडचणी, ताणतणाव यांचा फायदा घेत त्यांचे लैंगिक शोषण करणारे असे किती बाबा अजून समाजात आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. असे प्रकार वारंवार उघडकीस येत असतानाही समाजातील अगदी उच्चशिक्षित मंडळीही या बाबांच्या नादी लागत असल्याने, बाबांचा सुळसुळाट झाला आहे. नव्याने उदयास आलेला भोंदूचा प्रकार नाशिकच्या निफाड तालुक्यातील आहे.

अशोक खरात कशाप्रकारे महिलांचे लैंगिक शोषण करीत होता, हे विशेष पथकाच्या तपासातून पुढे येत असताना आता नाशिक जिल्ह्यातील दुसरा एक बाबा चर्चेत आला आहे. निफाड तालुक्यातील धारणगाव (खडक) येथील हा बाबा आहे. त्याने महिलेचे लैंगिक शोषण केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात या भोंदूविरोधात बलात्कारासह जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाशिक शहरातील ही पीडिता २८ वर्षांची आहे. ती खासगी नोकरी करते. तिचे दोन विवाह झाले आहेत. परंतु, दोन्ही अपयशी ठरले. त्यातच तिची मुलगीही तिच्याबरोबर नसल्याने निराश आहे. तिच्या आई-वडिलांना धारणगाव (खडक) येथील तथाकथित प्रतिगाणगापूर मठाविषयी माहिती मिळाली. त्याठिकाणी असलेला बाबा महेशगिरी ऊर्फ महेश दिलीप काकडे (वय ३१, रा. धारणगाव खडक) हा आपल्या मुलीला बरे करेल, असे त्यांना वाटले. त्यांनी मुलीला महेशगिरी काकडे याच्याकडे नेले. आपल्यात दैवी शक्ती असून महिलांमधील भुताटकी आपण काढतो, असा दावा तो करीत असे. १५ ऑगस्ट २०२४ रोजी पीडिता आई-वडिलांसह प्रतिगाणगापूर या त्याच्या मठात गेली असता भोंदू महेशगिरीने पीडितेला 'करणी' झाली असल्याचे सांगून काही विधी करण्यास भाग पाडले.

# वानखेडेवर ‘चेन्नई’चा ऐतिहासिक विजय; फिरकीच्या जाळ्यात अडकले मुंबईकर!

**मुंबई, वृत्तसंस्था :**

चेन्नई सुपर किंग्जने मुंबई इंडियन्सला वानखेडे स्टेडियमवर पराभूत केलं आहे. मुंबई इंडियन्सचा गड समजला जाणाऱ्या वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सला पराभूत करणं मुळीच सोपं नव्हतं. पण याच मैदानावर आता मुंबईला एका पाठोपाठ एक पराभवाचा सामना करावा लागत आहे. चेन्नईविरुद्ध वानखेडे स्टेडियमवर खेळताना मुंबईचा रेकॉर्ड दमदार होता. पण या सामन्यात मुंबईला एकतर्फी पराभवाचा सामना करावा लागला आहे. संजू सॅमसनच्या १०१ धावांच्या खेळीच्या बळावर चेन्नईने २०७ धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा बचाव करताना नूर अहमद आणि अकिल हुसेन यांनी मुंबईच्या फलंदाजांना आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकवलं. मुंबईला हा सामना १०३ धावांनी गमवावा लागला आहे.

या सामन्यात एमएस धोनी आणि रोहित शर्मा खेळणार असल्याची चर्चा होती. या सामन्याआधी एमएस धोनी वानखेडे स्टेडियमवर सराव करताना दिसून आला होता. पण या सामन्यासाठी त्याला संघात स्थान देण्यात आलेलं नाही. तो अजूनही पूर्णपणे फिट झालेला नाही. तर रोहित शर्मा देखील खेळणारा असल्याचं म्हटलं जात होतं. पण तो देखील पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. त्यामुळे मुंबई इंडियन्सचा संघ रोहित शर्माशिवाय मैदानात उतरला. या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकून चेन्नईला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. प्रथम फलंदाजी करताना चेन्नईकडून संजू सॅमसनने नाबाद १०१ धावांची दमदार शतकी खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने १० चौकार आणि ६ षटकार खेचले. तर ऋतुराज गायकवाडने २२, सर्फराज खानने १४, शिवम दुबेने ५, डेवाल्ड ब्रेव्हिस २१, कार्तिक शर्माने १८, जेमी ओव्हरटनने १५ तर अकिल हुसेनने २ धावा केल्या. यासह चेन्नईने २० षटकांअखेर ६ गडी बाद २०७ धावा केल्या. मुंबई इंडियन्सला हा सामना जिंकण्यासाठी २०८ धावांचा पाठलाग करायचा होता. त्यामुळे फलंदाजांकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. पण कुठलाच फलंदाज मोठी खेळी करू शकला नाही. क्विंटन डीकॉक अवघ्या ७ धावा करून माघारी परतला. तर दानिश मालेवार आणि नमन धीर हे दोघेही शून्यावर माघारी परतले. सूर्यकुमार यादवने ३६, तिलक वर्माने ३७, हार्दिक पांड्या १ धाव करून माघारी परतला. रुदरफोर्डकडून मोठया खेळीची अपेक्षा होती. पण तो पहिल्याच चेंडूवर शून्यावर माघारी परतला. या सामन्यात धावांचा बचाव करताना चेन्नई सुपर किंग्ज संघातील फिरकी गोलंदाजांनी मोलाची भूमिका बजावली. नूर अहमद आणि अकिल हुसेन या फिरकी गोलंदाजांनी मिळून ८ षटकात अवघ्या ४४ धावा खर्च केल्या आणि ६ गडी बाद केले. अकिल हुसेनने ४ षटकात १ निर्धाव षटक टाकत १७ धावा खर्च केल्या आणि ४ गडी बाद केले. तर तर नूर अहमदने २४ धावा खर्च करून २ गडी बाद केले.




## हार्दिकने पराभवाचं खापर कोणाच्या डोक्यावर फोडलं? सामन्यानंतर म्हणाला, “मी असा व्यक्ती नाही, जो...”

**मुंबई/वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धेतील ३३ वा सामना मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सच्या फलंदाजांचा फ्लॉप शो पाहायला मिळाला. मुंबईला विजयासाठी २०८ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना क्विंटन डीकॉक पासून ते शेफरेन रुदरफोर्डपर्यंत सर्वच फलंदाज फ्लॉप ठरले. मुंबईला हा सामना १०३ धावांनी गमवावा लागला. स्पर्धेतील पाचवा सामना गमावल्यानंतर हार्दिक पंड्या काय म्हणाला? जाणून घ्या.




धावांचा पाठलाग करताना मुंबईला पावरप्लेमध्ये हवी तशी सुरुवात करता आली नव्हती. याबाबत बोलताना हार्दिक पंड्या म्हणाला, “मला वाटतं, पावरप्लेमध्ये विकेट गेल्यानंतर काम अवघड होतं. कारण त्यामुळे आम्ही सामन्यात मागे पडत गेलो आणि त्यानंतर सावरू शकलो नाही.”

तसेच खेळपट्टीबाबत बोलताना तो म्हणाला की, “मी खेळपट्टीबद्दल काही बोलणार नाही. मी असा व्यक्ती नाही, जो पराभवाचं खापर खेळपट्टीवर फोडणार. त्यांनी खूप चांगली फलंदाजी केली. त्यांनी २०७ धावांचा डोंगर उभारला. तीच खेळपट्टी होती. आम्ही फक्त चांगली फलंदाजी करायला हवी होती. आमच्या फिरकी गोलंदाजांनीही चांगली गोलंदाजी केली. संजूने अप्रतिम फलंदाजी केली. त्यांच्या फलंदाजांनी सातत्याने धावा करत त्यांना एका मजबूत धावसंख्येपर्यंत पोहोचवलं. आव्हानाचा यशस्वी पाठलाग करण्यासाठी आम्हाला पावरप्लेमध्ये चांगल्या सुरुवातीची गरज होती. मोमेंटम आमच्या बाजूने असायला हवा होता, पण ते आम्हाला जमलं नाही.

पहिल्या डावात फलंदाजी करताना संजू सॅमसनने दमदार शतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर चेन्नई सुपर किंग्ज संघाने २०७ धावांचा डोंगर उभारला. मुंबईला हा सामना जिंकण्यासाठी २०८ धावा करायच्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना सलामीला आलेला क्विंटन डीकॉक शून्यावर माघारी परतला. तर दानिश मालेवार आणि नमन धीर हे दोघेही शून्यावर माघारी परतले. त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्माने मिळून मुंबईचा डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण तिलक वर्मा ३७ धावांवर बाद होताच मुंबईला लागोपाठ ३ मोठे धक्के बसले. सूर्यकुमार यादव ३७ धावा करून माघारी परतला. तर हार्दिक पंड्या १ आणि रूदरफोर्ड शून्यावर बाद झाला. मुंबईचा डाव १९ षटकात अवघ्या १०४ धावांवर आटोपला. यासह मुंबईने हा सामना १०३ धावांनी गमावला.

## गोलंदाजावर विजयानंतर दंडात्मक कारवाई, सेलिब्रेशन पडलं महागात

**मुंबई/वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सने लखनौ सुपर जायंट्स यांच्यात कमी धावसंख्येचा थरारक सामना पाहायला मिळाला. या सामन्यात राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना १५९ धावा केल्या, तर प्रत्युत्तरात लखनौचा संपूर्ण संघ ११९ धावांवर सर्वबाद झाला. यासह राजस्थानने ४० धावांनी विजय मिळवत गुणतालिकेत आपलं स्थान अधिक भक्कम केलं. पण या विजयानंतर राजस्थानच्या खेळाडूला मात्र धक्का बसला आहे.

राजस्थान रॉयल्सच गोलंदाज नांद्रे बर्गर याला दंड ठोठावण्यात आला. राजस्थानच्या या वेगवान गोलंदाजाला विनाकारण दंड ठोठावण्यात आला नाही; लखनौचा कर्णधार ऋषभ पंतसमोर त्याने केलेली कृती आयपीएलच्या आचारसंहितेच्या विरोधात मानली गेली. त्याला सामनाधिकाऱ्यासमोर हजर करण्यात आले, जिथे त्याने आपली चूक कबूल केली आणि त्याला शिक्षा झाली. नांद्रे बर्गरवर बीसीसीआयने दंडात्मक कारवाई केली असून त्याच्या सामना फीच्या १० टक्के रक्कम त्याला भरावी लागणार आहे. याव्यतिरिक्त, त्याच्या खात्यात एक डिमेरिट पॉईंट देखील जोडण्यात आला. राजस्थान रॉयल्सचा डावखुरा गोलंदाज आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.५ अंतर्गत लेव्हल १ च्या गुन्ह्यासाठी दोषी आढळला. त्याने सामनाधिकाऱ्यांसमोर आपली चूक कबूल केली. लखनौ सुपर जायंट्सच्या डावाच्या दुसऱ्या षटकात ऋषभ पंतची विकेट घेतल्यानंतर त्याने सेलिब्रेशन करत पंतला मैदानाबाहेर पाठवण्याचा इशारा केला, जे क्रिकेटच्या नियमांच्या विरुद्ध आहे. यासाठी नांद्रे बर्गर दोषी आढळला आहे. राजस्थान रॉयल्सने हा सामना ४० धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सची सुरुवात खूप खराब झाली. त्यांचे आघाडीचे फलंदाज झटपट तंबूत परतले. मात्र, मधल्या फळीत रवींद्र जडेजाने २९ चेंडूंमध्ये नाबाद ४३ धावा करून राजस्थानचा डाव सावरला.

## PSL मध्ये जोरदार राडा ; मोहम्मद आमिर – फहीम अशरफ मैदानावर भिडले

**मुंबई/वृत्तसंस्था**

भारतात सध्या आयपीएल २०२६ स्पर्धा सुरु आहे. तर पाकिस्तानात पाकिस्तान सुपर लीग म्हणजेच पीएसएल स्पर्धेचा थरार सुरु आहे. ज्या विदेशी खेळाडूंना आयपीएल खेळण्याची संधी मिळालेली नाही. ते सध्या पीएसएल खेळण्यात व्यस्त आहेत. ही स्पर्धा क्रिकेट आणि रेकॉर्ड्स सोडून इतर बऱ्याच कारणांमुळे चर्चेत असते. याआधी झालेल्या सामन्यात पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदी बाद झाल्यानंतर रागात बॅट आपटताना दिसून आला होता. दरम्यान गुरुवारी स्पर्धेतील ३४ वा सामना रावळपिंडी आणि इस्लामाबाद यूनायटेड या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात दोन्ही संघातील खेळाडूंमध्ये जोरदार वाद झाल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. मोहम्मद आमिरने फहीम अशरफला बाद केल्यानंतर, असं काही केलं ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होऊ लागला आहे.



तर झाले असे की, रावळपिंडी संघाची फलंदाजी सुरु असताना, १७ वे षटक टाकण्यासाठी मोहम्मद आमिर गोलंदाजी करण्यासाठी आला होता. त्यावेळी स्ट्राईकवर असलेल्या फहीम अशरफने मोहम्मद आमिरच्या बाऊन्सर चेंडूवर थर्ड मॅनच्या दिशेने फटका मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी चेंडू बॅटचा कडा घेऊन यष्टीरक्षक मोहम्मद रिझवानच्या हातात गेला. त्याने कुठलीही चूक न करत सोपा झेल घेतला. विकेट घेतल्यानंतर मोहम्मद आमिरने जे नको करायला होतं, तेच केलं. त्याने रागात फहीम अशरफला मैदानाबाहेर जाण्याचा इशारा केला. मोहम्मद आमिरने केलेला हा इशारा फहीम अशरफला मुळीच आवडलं नाही. फहीम अशरफ मोहम्मद आमिरच्या अंगावर धावून गेला. दोघांमध्ये बाचाबाची सुरु होती. इतक्यात इस्लामाबाद युनायटेड संघातील खेळाडू मध्यस्थी करण्यासाठी धावून आले. या वादाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. विकेट घेतल्यानंतर मोहम्मद आमिरने जे नको करायला होतं, तेच केलं. त्याने रागात फहीम अशरफला मैदानाबाहेर जाण्याचा इशारा केला. मोहम्मद आमिरने केलेला हा इशारा फहीम अशरफला मुळीच आवडलं नाही. फहीम अशरफ मोहम्मद आमिरच्या अंगावर धावून गेला. दोघांमध्ये बाचाबाची सुरु होती. इतक्यात इस्लामाबाद युनायटेड संघातील खेळाडू मध्यस्थी करण्यासाठी धावून आले. या वादाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

या सामन्यात रावळपिंडी संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या इस्लाबाद युनायडेट संघाकडून डेवोन कॉन्व्हेने ४० धावांची खेळी केली. तर ख्रिस ग्रीनने २९ धावांची खेळी केली. तर मार्क चॅपमनने २३ धावा केल्या. इस्लामाबाद युनायटेड संघाचा डाव १३७ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करताना रावळपिंडी संघाकडून मोहम्मद रिझवानने ४५, कामरान घुलामने ४२ आणि शेवटी डॅरिल मिशेलने नाबाद ३२ धावांची खेळी केली. हा सामना रावळपिंडी संघाने ६ गडी राखून आपल्या नावावर केला.


# विशाल कोटियनचे राखी सावंतबद्दल वक्तव्य; म्हणाला, "झोपल्यानंतर आणि सकाळी उठण्याआधीच..."

रा 'बिग बॉस मराठी'चे सहावे पर्व संपले असले तरी या पर्वातील स्पर्धकांची अजूनही चर्चा सुरू आहे. विविध मुलाखती, सोशल मीडियावरील पोस्ट, व्हिडीओ या माध्यमातून हे कलाकार प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. काही स्पर्धकांचे रियुनियनही पाहायला मिळत आहेत.

बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाची विजेती तन्वी कोलते ठरली, तर उपविजेता राकेश बापट ठरला. तिसऱ्या क्रमांकावर विशाल कोटियनला समाधान मानावे लागले.

विशाल कोटियन या पर्वात पहिल्या दिवसापासून होता. त्याच्या गेमचे वेळोवेळी कौतुक झाले. त्याला मास्टरमाईंडही म्हटले गेले. काही वेळा त्याच्या चुकांसाठी भाऊच्या धक्क्यावर त्याला सुनावले गेले. घरातील काही स्पर्धकांबरोबर त्याची चांगली बॉण्डिंग होती. राखी सावंत व त्याच्या मैत्रीचे कौतुक झाल्याचे पाहायला मिळाले.





आता विशालने एका मुलाखतीत घरातील स्पर्धकांबद्दल वक्तव्य केले आहे. विशालने नुकतीच नवशक्तीला मुलाखत दिली. या मुलाखतीत तो राखी सावंतबद्दल बोलला. तो म्हणाला, "राखी गेम व मैत्री हे वेगवेगळ्या ठिकाणी ठेवते. गेममध्ये मैत्री नाही आणि मैत्रीचा गेम नाही. जितकी स्ट्रॉंग ती खेळाडू किंवा स्पर्धक आहे, तितकीच ती मैत्री स्ट्रॉंग ठेवते. ती तुमच्यावर जिरे, मिरची सगळं टाकू शकते आणि त्याच्याच पाच मिनिटानंतर ती तुमच्याकडून कॉफी मागू शकते. याबद्दल आपण तिला विचारलं तर ती म्हणते की तो खेळ होता, ही मैत्री आहे. देणार आहे की नाही सांग, हे इतकं सोपं आहे."

पुढे तो म्हणाला, "ती जेव्हा घरात येते, तेव्हा ती सगळ्यांना त्यांचा गेम उंचावण्यासाठी मदत करते. ती आल्यानंतर तुमचा गेम उंचावला नाही तर तुम्ही वेडे दिसाल. झोपल्यानंतर आणि सकाळी उठण्याआधीच तुम्ही शांत असता, इतर वेळी राखी सावंत असते."

तो असेही म्हणाला, "राखी सावंत घरात आल्यानंतर सगळ्यांचाच गेम उंचावला. तिच्याबरोबर खेळायला मजा आली. हा पहिला सीझन आहे, ज्यामध्ये राखी सावंत फायनलिस्ट झाली नाही. आम्ही तिला पैशाची बॅग उचलू दिली नाही."

बिग बॉसच्या सहाव्या पर्वात राखी सावंत पहिली वाईल्ड कार्ड स्पर्धक म्हणून सहभागी झाली होती. राखीच्या घरात येण्याने अनेक समीकरणे बदलली. सुरुवातीला ती काटा ग्रुपकडून खेळत होती. राकेशवर तिचे प्रेम असल्याचे राखीने सांगितले. जेव्हा त्याने त्याचे तिच्यावर प्रेम नाही असे सांगितले, तेव्हा राखीला वाईट वाटले.


## "दादरलाच आहात मग घरी येऊन जा...", समीर चौघुलेंना राज ठाकरेंनी केला फोन!

म हाराष्ट्राची हास्यजत्रा' हा कार्यक्रम फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण जगभरात लोकप्रिय आहे. या शोने अनेक कलाकारांना प्रसिद्धी मिळवून दिली, यामुळे नवोदित कलाकारांना एक वेगळी मिळाली. सध्या हास्यजत्रेतील काही कलाकार विविध सिनेमांच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. तर, काही कलाकार रंगभूमीवर आपला ठसा उमटवत असल्याचं पाहायला मिळतंय. हास्यजत्रेतील लोकप्रिय अभिनेते समीर चौघुलेंच्या 'सम्या सम्या मैफिलीत माझ्या' या एकपात्री कार्यक्रमाला सुद्धा चाहत्यांचा तुफान प्रतिसाद मिळत आहे.

'सम्या सम्या मैफिलीत माझ्या' या एकपात्री कार्यक्रमाचे नुकतेच १०० प्रयोग पूर्ण झाले. या प्रयोगानंतर मनोरंजन विश्वातून या अभिनेत्यावर कौतुकाचा वर्षाव करण्यात आला.

मात्र, या सगळ्यात एक खास क्षण त्यांच्या विशेष लक्षात राहिला. एकपात्री कार्यक्रमाचे शंभर प्रयोग पूर्ण झाल्यावर समीर चौघुलेंना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी फोन केला. यानंतर समीर चौघुले शिवतीर्थावर त्यांची भेट घेण्यासाठी पोहोचले होते. या भेटीचा खास अनुभव त्यांनी पोस्ट शेअर करत सर्वांना सांगितला आहे.





समीर चौघुले लिहितात, "सम्या सम्या मैफिलीत माझ्या' या माझ्या एकपात्री कार्यक्रमाचे १०० प्रयोग झाल्याबद्दल अभिनंदनाचे अनेक फोन आले...पण एक कॉल खूपच अनपेक्षित आणि खास होता... तो होता अत्यंत दिलखुलास, दर्दी, कलासक्त नेते... माननीय राजसाहेब ठाकरे यांचा... "दादरलाच आहात ना मग घरी येऊन जा"....आणि मग झाली एका राजामाणसाबरोबर एक सहजसुंदर भेट, भरपूर गप्पा आणि हास्यजत्रेवरील प्रेम.. आणि हो मी निघताना १०० प्रयोग झाल्याबद्दल मला आणि माझ्या सहचारिणीला दिलेली सुंदर भेटवस्तू ..मनापासून आभार साहेब...!

दरम्यान, समीर चौघुलेंनी शेअर केलेल्या या पोस्टवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. त्यांच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर, समीर चौघुलेंनी आजवर अनेक कॉमेडी शो, सिनेमे आणि नाटकांमध्ये काम केलेलं आहे. नुकताच त्यांना 'गुलकंद' सिनेमातील भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्याचा 'झी चित्र गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## अक्षय कुमार व विद्या बालन पुन्हा एकत्र दिसणार; अभिनेता म्हणाला...

अ क्षय कुमार हा गेल्या काही दिवसांपासून मोठ्या चर्चेत आहे. त्याचा भूत बंगला हा सिनेमा प्रदर्शित झाला आहे. १७ एप्रिलला प्रदर्शित झालेल्या या सिनेमाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे. सिनेमाने जगभरात १०० कोटींगहून अधिक कमाई केली आहे.

प्रियदर्शन दिग्दर्शित या सिनेमात अक्षय कुमारसह अरसानी, राजपाल यादव, वामिका गब्बी, मिथिला पालकर, तब्बू हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांत आहेत. या सिनेमातील कॉमेडी प्रेक्षकांना आवडत असल्याचे दिसत आहे. याबरोबरच, अक्षय कुमारने विविध मुलाखतींमध्ये केलेली वक्तव्येदेखील सध्या चर्चेत आहेत. आता मात्र अक्षय कुमार एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे.

अभिनेत्री विद्या बालन व अक्षय कुमार पुन्हा एकदा दिसणार आहेत. ही जोडी पुन्हा एकदा पडद्यावर धुमाकूळ घालण्यासाठी सज्ज आहे. अन्नीस बज्मींच्या पुढील प्रोजेक्टमध्ये ही जोडी दिसणार आहे. अक्षयने त्याच्या इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला. या व्हिडीओमध्ये पाहायला मिळते की अक्षय कुमार विद्या बालनबरोबर विमानात चढताना दिसत आहे. यावर समजते की तो अभिनेत्रीसह केरळला शूटिंगसाठी गेला आहे. अक्षयने हा व्हिडीओ शेअर करत लिहिले, "पुढचा स्टॉप: देवभूमी. केरळ. अन्नीस बज्मींचा पुढचा चित्रपट हा माझा विद्या बालनबरोबरचा चौथा सिनेमा असेल. आमच्या जोडीला मिळालेले यश तसेच राहो." अभिनेत्याच्या या पोस्टवर अनेकांनी कमेंट केल्या आहेत. तसेच, या जोडीला पुन्हा एकदा एकत्र पाहण्यासाठी उत्सुक असल्याचे कमेंटमध्ये लिहिले आहे. याआधी अक्षय कुमार आणि विद्या बालन यांनी हे बेबी, मिशन मंगल आणि भूल भुलैय्या या सिनेमांत एकत्र काम केले आहे. त्यांच्या या तिन्ही सिनेमांना प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले आहे. आता या सिनेमाचे काय नाव आहे, हा सिनेमा कधी प्रदर्शित होणार, अक्षय व विद्या यांच्यासह कोणते कलाकार असणार याबद्दल कोणतीही माहिती समोर आली नाही.

## अमराठी रिक्षा चालकांना धनंजय पोवारचा इशारा; म्हणाला, "महाराष्ट्रात.."

१ मेपासून राज्यात परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मराठी वाचता-लिहिता न येणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्याचा इशाराच दिला आहे. यामुळे रिक्षा व टॅक्सी चालक संघटना आक्रमक झाल्या आहेत. परवाने रद्द केल्यास उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे या निर्णयाला रिक्षा व टॅक्सी चालक संघटनांनी विरोध दर्शवला आहे.

अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांनी निर्णयाला विरोध दर्शवत मोठ्या प्रमाणावर संपाचा इशारा दिला आहे. सुमारे १५ लाख चालक रस्त्यावर उतरणार असल्याचा दावा संघटनांकडून करण्यात आला आहे. दरम्यान या संपावर आता विविध सत्रातून प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. मराठी कलाविश्वातील कलाकारांनीसुद्धा सरनाईक यांच्या निर्णयावर आणि संपावर आपली स्पष्ट मतं व्यक्त केली आहेत.

यासह 'बिग बॉस मराठी ५'मधील धनंजय पोवारने यावर प्रतिक्रिया दिली आहे. तो आपल्या पोस्टमध्ये म्हणतो, "आज १५,००,०००/- लोक रस्त्यावर येत आहेत ते त्यांच्या रोजीरोटीसाठी... त्यांच्या हक्कांसाठी... त्यांच्या हक्कासाठी मराठी लोक उभे राहतील. पण आमच्या भाषेच्या, आमच्या अस्मितेच्या विरोधात जर तुम्ही रस्त्यावर येत असाल, तर तो आमच्या मराठी अस्मितेचा अनादर असेल आणि असे असेल तर तुमची आमच्या महाराष्ट्राला कोणतीही गरज नाही. आजपर्यंत महाराष्ट्रात संघर्षाचा इतिहास आहे आणि तो संघर्ष आमच्यासाठी रोजचा घटक आहे."



यासह अभिनेता अंशुमन विचारेने सुद्धा यावर "मराठी मातीत कमवून माज करायचा नाही. मराठी सगळ्यात आधी" अशी मोजक्या शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

मराठी गायक उत्कर्ष शिंदेनेही यावर पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तो अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना थेट म्हणतो, "मराठी येत नसेल तर शिका आणि शिकायचीच नसेल तर निघा... परप्रांतीय मित्रांनो, आम्हाला तुमचा द्वेष नाही. हा आमच्या मराठी भाषेसाठीचा, मान, सन्मान आणि अभिमान आहे. तुम्हाला मराठीच कळत नाही किंवा कळून घ्याचीच नाही म्हटल्यावर मराठी अस्मिता काय कळणार. ठीक आहे! तुम्हाला कळेल त्या भाषेत समजवण्याचा प्रयत्न मराठी माणूस नक्की करेल." कलाकारांच्या या स्पष्टवक्तेपणामुळे रिक्षा चालकांचे आंदोलन आणि मराठी भाषेचा सक्तीचा नियम यावरून आता राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले आहे. दरम्यान, कलाकारांनी शेअर केलेल्या या पोस्टवर नेटकऱ्यांनीसुद्धा त्यांच्या मताशी सहमती दर्शवली आहे.

# राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांसाठी बुलढाणा पॅटर्न ठरणार आदर्श...

## तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचा राज्यस्तरावर गौरव

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करून प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी राबविलेल्या सहज प्रणाली या नावीन्यपूर्ण उपक्रमाची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बुलढाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी तथा विद्यमान पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांचा मुंबई येथे विशेष सन्मान करण्यात येणार आहे. सह्याद्री अतिथीगृहात गौरव सोहळा : महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या वतीने २८ एप्रिल २०२६ रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात द्वितीय सेवा हक्क दिन राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात राज्याचे मुख्य सचिव यांच्या शुभहस्ते डॉ. किरण पाटील यांना सन्मानित केले जाईल. महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या सचिव वैशाली राज चव्हाण यांनी पत्राद्वारे ही माहिती दिली आहे. सहज प्रणाली ठरली दिशादर्शक: डॉ. किरण पाटील यांनी बुलढाणा जिल्हाधिकारी पदावर कार्यरत असताना सामान्य नागरिकांना शासकीय सेवा अधिक सुलभतेने मिळाव्यात, यासाठी सहज प्रणाली हा नाविन्यपूर्ण उपक्रम अत्यंत प्रभावीपणे राबविला. या उपक्रमामुळे प्रशासकीय कामात सुसूत्रता येऊन नागरिकांचा वेळ आणि श्रम वाचण्यास मोठी मदत झाली. डॉ. पाटील यांनी राबविलेला हा उपक्रम संपूर्ण राज्यासाठी एक आदर्श प्रस्थापित करणारा ठरला असून, राज्यातील इतर जिल्हाधिकाऱ्यांनाही यातून प्रेरणा मिळावी, या हेतूने आयोगामार्फत त्यांचा यथोचित सन्मान केला जात आहे. या गौरव सोहळ्याला राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त आणि मुख्य सचिव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. डॉ. किरण पाटील यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# मेळघाटात रामसेतूला हिरवा कंदील! केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधवांच्या पाठपुराव्याला मोठं यश...

जनसंचलन/ संग्रामपूर

तालुक्यातील वारी हनुमान ते सलवान दरम्यान प्रस्तावित झुलता सेतूफ केबल-स्टेड पादचारी पुलासाठी वन विभागाने अखेर मंजुरी दिल्याने मोठा मार्ग मोकळा झाला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्यामुळे गती मिळाली असून त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. वारी हनुमान ते सलवान हा परिसर मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये येत असल्याने वन विभागाची परवानगी ही सर्वात मोठी अडचण होती. मात्र, या अडथळ्यावर मात करत वन मंत्रालयाकडून अखेर हिरवा कंदील मिळाला आहे. त्यामुळे आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाची डिझाईन तयार करून निविदा प्रक्रियाही सुरू केली आहे. सुमारे ७ कोटी ४६ लाख रुपयांच्या खर्चातून हा भव्य केबल-स्टेड एफओबी पादचारी पूल उभारला जाणार आहे. पुलाची उंची तब्बल ४५.८० मीटर असणार असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तो उभारला जाईल. या पुलामुळे वारी ते सलवान दरम्यानची वाहतूक अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | गुंतवणूक रक्कम ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# जिगाव प्रकल्प जळाला निष्काळजीपणा की मोठा कट?



जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील जिगाव प्रकल्पाशी संबंधित मोठी दुर्घटना समोर आली असून जलंब ते माटरगाव दरम्यान उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या साठवणूक केंद्राला भीषण आग लागल्याने प्रकल्पाला मोठा धक्का बसला आहे. या आगीत सिंचनासाठी वापरण्यात येणारे कोट्यवधी रुपयांचे पीव्हीसी पाईप पूर्णतः जळून खाक झाले आहेत. शेतकऱ्यांना बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी ही पाईपलाईन टाकण्यात येणार होती. मात्र, आगीमुळे संपूर्ण योजनेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून शेतकऱ्यांच्या आशांवर पाणी फिरल्याची भावना व्यक्त होत आहे. आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून ही आग अपघाती की घातपात, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच खामगाव व शेगाव येथील अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले, मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते. या घटनेमुळे प्रशासनाच्या सुरक्षेच्या उपाययोजनांवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. जिगाव प्रकल्पातील ही आग नेमकी कोणाच्या हलगर्जीपणामुळे लागली, याचा शोध घेण्याची मागणी आता जोर धरत आहे.

# मुंडकं सापडलं, धड सापडलं पण ती कोण? पोलिसांपुढे मोठं कोडं....


## ज.जामोदच्या राजुरा शिवारातील भीषण हत्याकांडाचा उलगडा जवळ? पोलिसांची शोधपत्रिका जारी; नागरिकांना आवाहन...



**वृत्तसंस्था जळगाव**

तालुक्यातील राजुरा शिवारात सापडलेल्या धडापासून वेगळ्या मुंडक्याच्या घटनेने संपूर्ण बुलढाणा जिल्हा हादरला असतानाच आता या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. हॅलो बुलढाणा वृत्त प्रसारित केल्यानंतर जळगाव जामोद पोलिसांनी अज्ञात मृत महिलेची ओळख पटविण्यासाठी अधिकृत शोधपत्रिका जारी केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिला अंदाजे २० ते ३० वयोगटातील असून उंची सुमारे ५ ते ५.३ फूट, मध्यम बांधा, सावळा वर्ण आणि काळे केस अशी वैशिष्ट्ये आहेत. तिच्या अंगावर हिरव्या रंगाचा टॉप, काळ्या रेषांचा कथिया रंगाचा पँट, निळसर ब्रा, गुलाबी सॅन्डल, उजव्या हातात काळा धागा आणि डाव्या हातात हिरवट बांगड्या आढळल्या आहेत. विशेष म्हणजे, शिर धडापासून वेगळे करण्यात आले असल्याने हा प्रकार अत्यंत क्रूर आणि नियोजित खून असल्याचा संशय अधिकच गडद झाला आहे. या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून पोलिसांनी आवाहन केले आहे की, अशा वर्णनाची महिला कुठे हरवलेली असल्यास तात्काळ जळगाव जामोद पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. तपासाला वेग देण्यात आला असून लवकरच या रहस्यमय हत्याकांडाचा पर्दाफाश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## दुधा परिसरात केबल चोरट्यांचा धुमाकूळ; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान, संताप उसळला!



**जनसंचलन/मेहकर**

तालुक्यातील दुधा परिसरात पैनगंगा नदी काठावरील शेतकऱ्यांवर संकट कोसळले असून २४ एप्रिलच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी वीज व पाण्याच्या मोटरला जोडलेल्या केबल्सची मोठ्या प्रमाणावर चोरी केली. या घटनेमुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून शेतीचे कामकाज अक्षरशः ठप्प झाले आहे. पिकांना पाणी देणे अशक्य झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. आधीच अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांवर आता या चोरीमुळे दुहेरी संकट ओढवले आहे. संतप्त शेतकऱ्यांनी पोलिस प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली असून तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी एकत्र येत पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज सादर केला असून चोरट्यांचा त्वरित बंदोबस्त करावा, चोरीस गेलेले साहित्य परत मिळवून द्यावे आणि परिसरात रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी केली आहे. या प्रकारामुळे ग्रामीण भागातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासनाने आता तरी जागे होण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८